RNI No. MAHBIL 2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र
असाधारण भाग एक–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १३, अंक - ०३] शुक्रवार, दिनांक मार्च १५, २०२४ / फाल्गुन २५, शके १९४५ [पृष्ठे ०७

असाधारण क्रमांक ०३

प्राधिकृत प्रकाशन

मुख्य कार्यकारी अधिकारी यांजकडून

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (क) अन्वये अंतिम आदेश

झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र अंतिम आदेश

क्रमांक झो.पु.प्रा./सप्रा-३/झो.पु.आ.-८०४/२०२४.— काळा खडक, वाकड येथील स. नं. १२४/१, अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे हे सक्षम आहेत ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दिनांक ५ डिसेंबर २०२३ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दिनांक १८ डिसेंबर २०२३ रोजी डकविण्यात आली असून दिनांक ८ डिसेंबर २०२३ रोजीच्या दैनिक लोकनायक व जनमंथन या स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे, तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, डिसेंबर २१ - २७, २०२३ मध्ये पृष्ठे १५ व १६ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली ही मिळकत महानगरपालिकेकडून झोपडपट्टी म्हणून घोषित नसली तरी सक्षम प्राधिकारी तथा सहायक आयुक्त, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. झोनिपु/०४/कावि/१२०/२०२०, दिनांक २९ ऑक्टोबर २०२० अन्वये सदर ठिकाणी सादर केलेला झोपडपट्टीसदृश परिस्थिती असलेबाबतचा अहवाल व सक्षम प्राधिकारी क्रमांक ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनीदेखील दिनांक २८ जानेवारी २०२२ रोजी स्थळपाहणी करून अहवाल स्वतंत्रपणे प्रकरणी दाखल केलेला आहे. ७/१२ नुसार एकूण ४६७००.०० चौ.मी. एवढे क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झालेली आहे ;

आणि ज्याअर्थी, सदरची पूर्वसूचना प्रसिद्ध करणेत येऊन ३० दिवसांचा कालावधी पूर्ण झाला आहे. सदर पूर्वसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे जागा मालक किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार सवित्रा सुरेश चौगुले व इतर ४ यांची ३ *(क)* पूर्वसूचनामध्ये नमूद केलेप्रमाणे विहित मुदतीत हरकत प्राप्त झाली होती. उपरोक्त हरकतदार यांची जागा प्रस्तुत पुनर्वसन योजनेच्या क्षेत्राच्या बाहेर असलेमुळे त्यांनी सदरबाबत घेतलेली हरकत ग्राह्य धरता येणार नसलेने त्यांची हरकत निकाली काढणेत आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे ;

एच-५२३, भाग एक-असा. (पु.वि.पु.)—०३

आणि ज्याअर्थी, सदर योजनेकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीचे क्षेत्र ४६७००.०० चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता मिळकतीकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३ *(क)* अंतिम करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण ४६७००.०० चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३ *(क)* च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३ *(क)* मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल.

अनुसूची

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

झोपडपट्टीचे नाव :- सर्व्हे नंबर १२४/१, काळा खडक, वाकड, जिल्हा पुणे

ठिकाण – काळा खडक, वाकड

स.नं./ सि.स.नं./ फा.प्लॉ. क्र.	जमिनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव	क्षेत्र (चौ.मी.)	योजना क्षेत्राची चतु:सीमा			
			पूर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
१	२	३	४	५	६	७
सर्व्हे नं. १२४/१, काळा खडक, वाकड, पुणे	खाजगी	४६७००.००	लागू स.नं. १२५	लागू स. नं. १२९	लागू रस्ता	लागू रस्ता ताथवडेची शीव.

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

नीलेश र. गटणे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, १३ मार्च २०२४.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (क) अन्वये अंतिम आदेश

झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

क्रमांक झो.पु.प्रा./सप्रा-३/झो.पु.आ.-८०५/२०२४.— सि.स.नं. ३९२३ पै. व ४६६३ पै., सॅनेटरी चाळ, पिंपरी येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे हे सक्षम आहेत ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दिनांक १ डिसेंबर २०२३ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दिनांक १४ डिसेंबर २०२३ रोजी डकविण्यात आली असून दिनांक १४ डिसेंबर २०२३ रोजीच्या लोकनायक व जनमंथन या स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे, तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, डिसेंबर १४ - २०, २०२३ मध्ये पृष्ठे १२ व १३ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली ही मिळकत महानगरपालिकेकडून झोपडपट्टी म्हणून घोषित नसली तरी सक्षम अधिकारी तथा सहायक आयुक्त, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. झोनिपु/०४/कावि-१७५/२०२३, दिनांक १८ ऑक्टोबर २०२३ अन्वये सदर ठिकाणी सादर केलेला झोपडपट्टीसदृश परिस्थिती असलेबाबतचा अहवाल व सक्षम प्राधिकारी क्रमांक ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनीदेखील दिनांक १ नोव्हेंबर २०२३ रोजी स्थळपाहणी करून दाखल केलेला स्वतंत्र अहवाल पाहता सदर ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याजोगी परिस्थिती आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे तसेच मा. जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा) आणि मा. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार सदर दिनांक १ डिसेंबर २०२३ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबतची पूर्वसूचना नोटिशीस कोणतीही हरकत/सूचना प्राप्त झालेली नाही ;

आणि ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर मिळकतीचा मोजणी नकाशा प्राप्त झाला असून त्यानुसार उपरोक्त योजनेकरिता ३३३२.११ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३ *(क)* अंतिम करणे क्रमप्राप्त आहे ;

आणि त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण ३३३२.११ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३ *(क)* च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३ *क* मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल.

अनुसूची

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

झोपडपट्टीचे नाव :- सिटी सर्व्हे नंबर ३९२३ पै. व ४६६३ पै. सॅनेटरी चाळ, पिंपरी, जिल्हा पुणे

ठिकाण – पिंपरी

स.नं./ सि.स.नं./ फा.प्लॉ. क्र.	जमीन/मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव (मालमत्ता पत्रकानुसार)	क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमिती नुसार	योजना क्षेत्राची चतु:सीमा			
			पूर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
१	२	३	४	५	६	७
३९२३ पै.	महाराष्ट्र सरकार (P.W.D. डिपार्टमेंट)	३३३२.११	रेल्वेलाईन	लागू रस्ता सि.स.नं. २९२२ व २९२४	सि.स.नं. २९२३ पै.	सि.स.नं. ४६६३ पै.
४६६३ पै.	महाराष्ट्र शासन					

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

नीलेश र. गटणे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, १३ मार्च २०२४.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुर्नाविकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (क) अन्वये अंतिम आदेश

झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

क्रमांक झो.पु.प्रा./सप्रा-३/झो.पु.आ.-८०६/२०२४.— स.नं. १४ पै., सि.स.नं. २८८०, २९०० ते २९१०, २९१३, २९१४, २९२३, २९२५ ते २९३३, २९६७ पै., २९७९ ते २९९९, ३००० ते ३००३, मिलिंदनगर, पिंपरी येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे हे सक्षम आहेत ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी डकविण्यात आली असून दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजीच्या दैनिक जनमंथन व दायित्व या स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे, तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे, विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जानेवारी २५ - ३१, २०२४ मध्ये पृष्ठे ३ व ४ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीलवरील योजनेचे क्षेत्र ७४७६.०२ चौ.मी. असून सदर मिळकत महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक ३१ जानेवारी १९९१ रोजी पृष्ठ २५० वर २१८२७.२४ चौ.मी. एवढे क्षेत्रावर झोपडपट्टी म्हणून घोषित करणेत आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा) आणि मा. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार सदर दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबतची पूर्वसूचना नोटिशीस कोणतीही हरकत/सूचना प्राप्त झालेली नाही ;

आणि ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर योजनेकरिता ७४७६.०२ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३ *(क)* अंतिम करणे क्रमप्राप्त आहे ;

आणि त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण ७४७६.०२ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३ *(क)* च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३ *(क)* मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल.

अनुसूची

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

झोपडपट्टीचे नाव :- स.नं. १४ पै., सि.स.नं. २८८०, २९०० ते २९१०, २९१३, २९१४, २९२३, २९२५ ते २९३३, २९६७ पै., २९७९ ते २९९९, ३००० ते ३००३, मिलिंदनगर, पिंपरी, जिल्हा पुणे.

गाव – आकुर्डी

स.नं./ सि.स.नं./ फा.प्लॉ. क्र.	जमीन/भोगवटादारांचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव	क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमितीय पद्धतीने)	योजना क्षेत्राची चतु:सीमा			
			पूर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
१	२	३	४	५	६	७
स. नं. १४ पै., सि.स.नं. २८८०, २९०० ते २९१०, २९१३, २९१४, २९२३, २९२५ ते २९३३, २९६७ पै., २९७९ ते २९९९, ३००० ते ३००३, मिलिंदनगर, पिंपरी.	महाराष्ट्र शासन	७४७६.०२	लागू स.नं. १४ पै. लागू सि.स.नं. २९३३ पै.	लागू स.नं. १४ पै. लागू सि.स.नं. २९३३ पै. २९६६ पै. ते २९६८ पै.	लागू स.नं. १४ पै. लागू सि.स.नं. ३००३ पै. २९७९ पै., २९१२ पै., २००१ पै, २८९९ पै.	लागू स.नं. १४ पै. लागू सि.स.नं. २८८१ पै. २८३३/२ पै. २८८५/१, २८८२/५, २९२२ पै. ते २९२४ पै. २९१५ पै. २९१४ पै. २९१३ पै.

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

नीलेश र. गटणे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, १३ मार्च २०२४.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (क) अन्वये अंतिम आदेश

झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

क्रमांक झो.पु.प्रा./सप्रा-३/झो.पु.आ.-८०७/२०२४.— सि.स.नं. ५२२७ पै., ५२२९ पै., (स.नं. ६१पै.), खंडोबा माळ, आकुर्डी, पुणे येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे हे सक्षम आहेत ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दिनांक २४ नोव्हेंबर २०२३ रोजी डकविण्यात आली असून दिनांक ७ डिसेंबर २०२३ रोजीच्या दैनिक जनमंथन या स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे, तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर ३० ते डिसेंबर ६, २०२३ मध्ये पृष्ठे ०५ व ०६ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेली ही मिळकत महानगरपालिकेकडून झोपडपट्टी म्हणून घोषित नसली तरी सक्षम अधिकारी तथा सहायक आयुक्त, झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र. झोनिपु/०४/ कावि/ १७६/२०२३, दिनांक १८ ऑक्टोबर २०२३ अन्वये सदर ठिकाणी सादर केलेला झोपडपट्टीसदृश परिस्थिती असलेबाबतचा अहवाल व सक्षम प्राधिकारी क्रमांक ३, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनीदेखील दिनांक १ नोव्हेंबर २०२३ रोजी स्थळपाहणी करून दाखल केलेला स्वतंत्र अहवाल पाहता सदर ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याजोगी परिस्थिती आहे ;

आणि, ज्याअर्थी, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पुणे तसेच मा. जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा) आणि मा. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार सदर दिनांक २३ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबतची पूर्वसूचना नोटिशीस कोणतीही हरकत/सूचना प्राप्त झालेली नाही ;

आणि ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर योजनेकरिता ६६८८.४७ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३ *(क)* अंतिम करणे क्रमप्राप्त आहे.

त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण ६६८८.४७ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३ *(क)* च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३ *(क)* मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल.

अनुसूची

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

झोपडपट्टीचे नाव :- सि.स.नं. ५२२७ पै. ५२२९ पै. (स.नं. ६१ पै.), खंडोबा माळ, आकुर्डी, जिल्हा पुणे.

गाव – आकुर्डी

स.नं./ सि.स.नं./ फा.प्लॉ. क्र.	जमीन/भोगवटादारांचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव	क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमितीय पद्धतीने)	योजना क्षेत्राची चतु:सीमा (न.भू.अ.पिं.चिं. तातडी हद्द कायम मो. र.नं. ५४६७/२०२४, रोजीच्या मोजणी नकाशनुसार)			
			पूर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
१	२	३	४	५	६	७
सि.स.नं. ५२२७ पै., ५२२९ पै. (स. नं. ६१ पै. प्लॉट नं. २अ.)	महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ	६६८८.४७	सि.स.नं. ५२२८ पै. लगत.	रस्ता	रस्ता	रस्ता

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

नीलेश र. गटणे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, १३ मार्च २०२४.

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३ (क) अन्वये अंतिम आदेश

झोपडपट्टी पुनर्वसन अंतिम आदेश

क्रमांक झो.पु.प्रा./सप्रा-३/झो.पु.आ.-८०८/२०२४.— स.नं. १४ पै., सि.स.नं. २८३४, २८३७ ते २८४९, २८५२, २८५३, २८५८ ते २८६०, २८६२ ते २८६५, २८६७, २८६९, आदर्शनगर, पिंपरी येथील अनुसूचीत नमूद केलेल्या क्षेत्रासंदर्भात महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* अंतर्गत खालीलप्रमाणे अंतिम आदेश पारित करणेत येत आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* मध्ये नमूद तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे हे सक्षम आहेत ;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याची दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजीची पूर्वसूचना प्रत्यक्ष जागेवर दिनांक २५ जानेवारी २०२४ रोजी डकविण्यात आली असून दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजीच्या दैनिक राष्ट्रतेज व हमारा महानगर या स्थानिक वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे, तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-एक, पुणे विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जानेवारी २५ - ३१, २०२४ मध्ये पृष्ठे ४, ५ व ६ वर प्रसिद्ध करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, खालील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीवरील योजनेचे क्षेत्र ३५४९.२५ चौ.मी. असून सदर मिळकत महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक ३१ जानेवारी १९९१ रोजी पृष्ठ २५० वर २१८२७.२४ चौ.मी. एवढे क्षेत्रावर झोपडपट्टी म्हणून घोषित करणेत आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, मा. जिल्हाधिकारी, पुणे (महसूल शाखा) आणि मा. आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका किंवा इतर यांना त्यांच्या ज्या काही सूचना/हरकती असतील त्या ३० दिवसांचे आत या कार्यालयाकडे सादर करणेबाबत फर्माविण्यात आले होते. त्यानुसार सदर दिनांक १२ जानेवारी २०२४ रोजीच्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणेबाबतची पूर्वसूचना नोटिशीस कोणतीही हरकत/सूचना प्राप्त झालेली नाही;

आणि ज्याअर्थी, सदर क्षेत्रावरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबतच्या संदर्भात कोणताही प्रतिबंधात्मक आदेश नसल्यामुळे व झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसंदर्भातील परिस्थिती अस्तित्वात असल्याने सदर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर योजनेकरिता ३५४९.२५ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मिळकतीकरिता झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश ३ *(क)* अंतिम करणे क्रमप्राप्त आहे ;

आणि त्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमूद एकूण ३५४९.२५ चौ.मी. एवढे योजना क्षेत्र हे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेकामी समर्थनीय ठरणारी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल माझी खात्री झाल्याने उपरोक्त परिस्थितीचे अवलोकन करता सदर अधिनियमातील कलम ३ *(क)* च्या तरतुदीनुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

(१) अनुसूचीमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले क्षेत्र महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३ *(क)* अंतर्गत या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्यात येत आहे.

(२) सदरच्या आदेशामुळे बाधित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त अधिनियमाच्या कलम ३ *(क)* मधील तरतुदीनुसार प्रस्तुत आदेश प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई येथे अपील दाखल करता येईल.

अनुसूची

महानगरपालिका क्षेत्र :- पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

झोपडपट्टीचे नाव :- स.नं. १४ पै., सि.स.नं. २८३४, २८३७ ते २८४९, २८५२, २८५३, २८५८ ते २८६०, २८६२ ते २८६५, २८६७, २५६९, आदर्शनगर, पिंपरी, जिल्हा पुणे.

गाव – आकुर्डी

स.नं./ सि.स.नं./ फा.प्लॉ. क्र.	जमीन/भोगवटादारांचे हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव	क्षेत्र (चौ.मी.) (त्रिमितीय पद्धतीने)	योजना क्षेत्राची चतु:सीमा			
			पूर्वेस	दक्षिणेस	पश्चिमेस	उत्तरेस
१	२	३	४	५	६	७
१४ पै., २८३४, २८३७ ते २८४९, २८५२, २८५३, २८५८ ते २८६०, २८६२ ते २८६५, २८६७ २८६९,	महाराष्ट्र शासन	३५४९.२५	नाला	लागू स.नं. १४ पै. सि.स.नं. २८६९ पै. २८६७ पै. २८५१ पै.	लागू स.नं. १४ पै. लागू सि.स.नं. २८७९ पै.	लागू स.नं. १४ पै. सि.स.नं. २८३३/१ पै. २८३४ पै.,

अनुसूची--*चालू*

गाव – आकुर्डी--*चालू*

१	२	३	४	५	६	७
आदर्शनगर, पिंपरी.						२८४२ पै., २८४५ पै., २८४६ पै.

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह पारित करण्यात येत आहे.

नीलेश र. गटणे (भा.प्र.से.),
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

पुणे, १३ मार्च २०२४.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.